321

## MAHARASHTRA ACT No. XL OF 1983

THE LEPERS (MAHARASHTRA REPEAL) ACT, 1983.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ६ ऑगस्ट १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XL OF 1983.

*AN ACT*

TO REPEAL THE LEPERS ACT, 1898, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक ९ ऑगस्ट १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

### सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.

कुष्ठरोग्यांबाबत अधिनियम, १८९८ हा महाराष्ट्र राज्यास लागू होतो, तेथवर त्याचे निरसन करण्यासाठी अधिनियम.

१८९८ चा ३. ज्याअर्थी, कुष्ठरोग्यांबाबत अधिनियम, १८९८ हा आता लुप्तप्राय आणि अनावश्यक झालेला आहे आणि उक्त अधिनियम महाराष्ट्र राज्यास लागू होतो तेथवर तो निरसित करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, कुष्ठरोग्यांबाबत (महाराष्ट्र निरसन) अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा तारखेस अमलात येईल.

सन १८९८ चा ३ अधिनियम क्रमांक ३ चे निरसन.

२. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस कुष्ठरोग्यांबाबत अधिनियम, १८९८ हा, तो महाराष्ट्र राज्यास लागू होतो तेथवर निरसित झालेला असेल. १८९८ चा ३.

शंका निवारण.

३. कोणत्याही शंकांच्या निवारणासाठी, याद्वारे, असे घोषित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही कुष्ठधामात, उक्त निरसित अधिनियमान्वये अटकावून ठेवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून, मुक्त झालेल्या असतील, आणि कोणत्याही स्थानिक क्षेत्रातून यांनी ये-जा करण्यावर किंवा कोणतीही आजीविका किंवा व्यवसाय करण्यावर त्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यांच्यापैकी कोणावरही घातलेले कोणतेही निर्बंध रद्द होतील.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.